| केंद्र क्रमांक | आसन क्रमांक | प्रश्नपत्रिका कोड क्र. |
|---|---|---|
| | | 0111 |

# माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा
## फेब्रुवारी २००५
## भाषा ( मराठी )
## (एकूण गुण–१००)

*सर्वसामान्य सूचना:—*

*खाडाखोड केलेली अगर गिरविलेली उत्तरे ग्राह्य धरली जाणार नाहीत.*

## विभाग 1
## (गुण — 20)

***सूचना:— (1) प्रश्नक्रमांक 1 व 2 उत्तरपत्रिकेच्या विभाग 1 मध्येच लिहावेत.***

***(2) या विभागातील प्रत्येक प्रश्नास 10 गुण आहेत.***

***(3) सुंदर हस्ताक्षर व टापटीप यासाठी दोन गुण राखून ठेवलेले आहेत.***

**1.** खालील विषयावर 10 ओळी निबंध लिहा: त्यासाठी खाली दिलेल्या मुद्द्यांचा उपयोग करा.

*'पाणी अडवा-पाणी जिरवा'* .........

(मुद्दे:— पाणी म्हणजे जीवन — पाण्याची गरज — पाण्याचा होणारा अपव्यय — पावसाचे पाणी अडविणे.)

**2.** दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कल्पना विस्तार करा.

*'तीर्थी धोंडा पाणी, देव रोकडा सज्जनी'*

मुद्दे:— उक्तीचा अर्थ , स्पष्टीकरण , उदाहरणे

## विभाग 2

## (गुण — 80)

**सूचना:—** *(1) विभाग 2 मधील 3 ते 42 प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेच्या विभाग 2 मध्येच लिहावीत.*

*(2) विभाग 2 मधील प्रश्नांना प्रत्येकी 2 गुण आहेत.*

*(3) विभाग 2 मधील प्रत्येक प्रश्नात दिलेल्या सुचनेनुसार जे बरोबर असेल त्याचा पर्यायक्रमांक त्या प्रश्नाच्या समोरील चौकटीत लिहा.*

**प्र. 3. ते 7.** → **खाली दिलेला उतारा काळजीपूर्वक वाचा. त्याखाली दिलेल्या प्रत्येक प्रश्नासाठी उत्तराचे चार पर्याय दिलेले आहेत. योग्य पर्यायाची निवड करून त्याचा क्रमांक उत्तरपत्रिकेत प्रश्नक्रमांकासमोरील चौकटीत लिहा.**

*महत्त्वाकांक्षा हा तर तरुणाचा स्थायीभाव! मी मोठा होईन, परिस्थितीच्या डोक्यावर पाय ठेवून मी तिला वाकवीन, ही तरुणाची उभारीची ऊर्मी असते! निर्भयता म्हणजे तरुणाच्या जीवनसंगीतातला सगळ्यात उंच स्वर. 'भय' हा या स्वराचा फुटलेला चिरका आवाज! चिरका आवाज कुणाला कधीतरी आवडेल का? जग उंच स्वराची तान ऐकायला उत्सुक असतं, चिरका आवाज नाही.*

*अभिमान असतो तारुण्याचा आत्मा! ज्या माणसात श्रद्धा नाही तो माणूस नाही आणि ज्या तरुणात अभिमान नाही तो तरुण नाही. तरुण माणूस हा आपल्या श्रद्धांचा नेहमीच अभिमान बाळगतो. त्यांच्यासाठी प्रसंगी प्राण द्यायलाही त्याला तयार असावं लागतं आणि औदार्य म्हणजे तर तरुणाचा अलंकार! आपल्या शक्तीचा इतर दुर्बलांच्या संरक्षणासाठी केलेला वापर. आपण जगून इतरांना जगविण्याचं अमोल साधन!*

3. तरुणाचा स्थायीभाव कोणता?

(1) ऊर्मी

(2) महत्त्वाकांक्षा

(3) निर्भयता

(4) उत्सुकता

4. तरुण माणूस सतत कशाचा अभिमान बाळगतो?

(1) श्रद्धांचा

(2) आत्म्याचा

(3) औदार्याचा

(4) जीवनाचा

5. तरुणांचा अलंकार कोणता सांगितला आहे?

(1) अभिमान

(2) स्थायीभाव

(3) औदार्य

(4) आत्मा

6. तरुणांकडे कोणत्या गुणांचा ठेवा असावा?

(1) फक्त महत्त्वाकांक्षा

(2) फक्त निर्भयता

(3) फक्त श्रद्धा

(4) महत्त्वाकांक्षा, निर्भयता, श्रद्धा

7. या उताऱ्यातील तरुणांना कोणती ऊर्मी असते?

(1) दुर्बलांच्या संरक्षणाची

(2) निरर्थक अभिमानाची

(3) परिस्थितीला वाकविण्याची

(4) निसर्गावर मात करण्याची

**प्र. 8. ते 12.** → **खालील संवाद वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांच्या योग्य उत्तराचे पर्यायक्रमांक चौकटीत लिहा.**

*"अरे, तू आज इकडे कसा, आणि तुझे वडील कोठे आहेत?"*

*"काका, मी घरातून शाळेला म्हणूनच निघालोय, पण नकोच वाटतयं."*

*"अरे, पण असं घडलं तरी काय?"*

*"डॉक्टरकाका, म्हातारपणावर तुमच्याकडे कुठलच औषध नाही का हो?"*

*"काय? म्हातारपणावर औषध! हे कसलं वेड घेऊन बसलास तू दिनू?"*

*"काका माझा मोत्या म्हातारा झालाय हो! तो आता पूर्वीसारखा मुळीच राहिलेला नाही. वाऱ्याशी पैज लावणारा, माझ्याशी बागेत बागडणारा, माझा चेंडू तोंडात धरुन पळणारा, माझा पूर्वीचा मोत्या मला हवा आहे हो!"*

8. दिनूला शाळेत जायला नकोसे का वाटते?

(1) दिनूला शाळा आवडत नव्हती.

(2) दिनूला मोत्याबरोबर खेळायचे आहे.

(3) आता मोती म्हातारा झाला होता.

(4) शाळेत सारखी म्हाताऱ्या मोत्याची आठवण येत असे.

9. हा संवाद कोणाकोणात झाला आहे?

(1) दिनूचे वडील व काका

(2) दिनू व डॉक्टरकाका

(3) दिनू व त्याचे वडील

(4) दिनू, डॉक्टरकाका व दिनूचे वडील

10. या संवादातील मोत्या कोण?

(1) दिनूचे वडील

(2) दिनूचा भाऊ

(3) दिनूचा कुत्रा

(4) नक्की सांगता येत नाही

11. हा संवाद कोठे घडला असावा?

(1) रस्त्यात (2) चौकात

(3) शाळेत (4) दवाखान्यात

12. 'वाऱ्याशी पैज लावणारा' याचा नेमका अर्थ कोणता?

(1) वाऱ्याच्या दिशेने धावणारा

(2) वाऱ्याच्या विरुद्ध धावणारा

(3) तोंडात चेंडू धरुन पळणारा

(4) वाऱ्याच्या गतीने पळणारा

**प्र. 13. ते 17.** → **खाली एका सुसंगत परिच्छेदाची पाच वाक्ये दिली आहेत. योग्य पर्याय निवडून परिच्छेदाची वाक्ये पूर्ण करण्यासाठी योग्य शब्दाचा पर्यायक्रमांक लिहा.**

13. भर दुपारची वेळ होती. सूर्य ————

(1) आग लावत होता.

(2) आग ओकत होता.

(3) आगीत तेल टाकत होता.

(4) आग विझवत होता.

14. ती आपल्या धन्याची भाकर घेऊन ———— शेताकडे जात होती.

(1) सावकाश

(2) हळूहळू

(3) संथपणे

(4) झपाझप

15. ती अनवाणी असल्याने पाय ———— पोळत होते.

(1) चटाचटा

(2) झटाझटा

(3) पटापटा

(4) तटातटा

16. तिचा धनी मोटेवर होता. मोट ———— करीत चालली होती.

(1) कुरकुर

(2) कुईकुई

(3) भरभर

(4) सरसर

17. उसळ्या मारणारं पाणी डोणीत पडून पुढे पाटातून ———— वाहत होतं.

(1) सळसळत

(2) घोंगावत

(3) झुळझुळ

(4) घुसळत

**प्र. 18. ते 22.** → **खालील कविता वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे शोधा व त्यांचे पर्यायक्रमांक लिहा.**

*विद्येनेच मनुष्या आले श्रेष्ठत्त्व ह्या जगामाजी;*
*न दिसे एकहि वस्तू विद्येनेही असाध्य आहेजी।।*
*देऊनि किंवा भोगुनि उणे न होता सदैव वाढतसे;*
*ऐसे एकचि विद्याधन, अद्‌भुत गुण न हा दुज्यात वसे।।*
*नानाविध रत्नांची कनकांची असति भूषणे फार;*
*परि विद्येसम एकहि शोभादायक नसे अलंकार।।*
*या साऱ्या भुवनी हित-कर विद्येसारखा सखा नाही;*
*अनुकूल ती जयाला नित्य तयाला उणे नसे काही।।*
*गुरुपरि उपदेश करी, संकट समयी उपायही सुचवी;*
*चिंतित फळ देऊनिया, कल्पतरुपरि मनोरथा पुरवी।।*
*विद्येच्या सामर्थ्ये केला रविचित्रकार मनुजाने;*
*होऊनि अंकित वायुहि, तुष्ट करि त्यास सुस्वरे गाने।।*
*यापरि सकल सुखे जी देई, दुःखे समस्त जी वारी;*
*त्या विद्यादेवीते, अनन्यभावे सदा भजा भारी।।*
*ऐश्वर्यबलधनादिक सौख्यें प्रसवे समस्त जी काही;*
*ती विद्या जो देई, तेणे वद काय ते दिले नाही?*

18. सर्व धनांमध्ये कोणते धन श्रेष्ठ आहे?

(1) दागिने (2) पैसा

(3) वस्तू (4) विद्या

19. विद्येमध्ये कोणता अद्‌भुत गुण असतो?

(1) ती स्थिर राहते.

(2) ती दिल्याने वाढत जाते.

(3) ती दिल्याने कमी होते.

(4) ती न देता वाढत जाते.

20. या कवितेत 'सोने' या अर्थी कोणता शब्द आला आहे?

(1) सुवर्ण

(2) धन

(3) कनक

(4) कांचन

21. विद्या आपणास कशी उपयोगी पडते?

(1) फक्त असाध्य ते साध्य करण्यासाठी

(2) फक्त संकटात उपाय सुचविण्यासाठी

(3) फक्त जीवनात सर्व सौख्य मिळविण्यासाठी

(4) सर्व पर्याय बरोबर

22. या कवितेत 'स्नेही' या अर्थाचा कोणता शब्द आला आहे?

(1) सखा

(2) गुरु

(3) मित्र

(4) दोस्त

**23.** खालीलपैकी अनेकवचनी शब्दाचा क्रमांक लिहा.

(1) सासू (2) पिसू

(3) अश्रू (4) पाखरु

**24.** ***'समर'*** या शब्दाला कोणता शब्द समानार्थी नाही.

(1) संगर (2) युद्ध

(3) रणांगण (4) संग्राम

**25.** *'ऐच्छिक'* शब्दाला कोणता उपसर्ग जोडल्यानंतर त्याचा विरुद्धार्थी शब्द तयार होतो?

(1) अन् (2) बे

(3) गैर (4) निर

**26.** खालील वाक्यात कोणता वाक्प्रचार योजावा?

— ***शिव***रायांचा राज्याभिषेक सोहळा पाहतांना जिजाबाईचे ...

(1) डोळे निवणे.

(2) डोळ्यात प्राण आणणे.

(3) डोळेझाक करणे.

(4) डोळे मिटणे.

**27.** 'पळसाला पाने तीनच' या अर्थाची म्हण खालीलपैकी कोणती?

(1) दुरुन डोंगर साजरे

(2) उंदराला मांजर साक्ष

(3) इकडे आड तिकडे विहीर

(4) घरोघरी मातीच्या चुली

28. ***'बिनभाड्याचे घर'*** या अलंकारिक शब्दाचा अर्थ कोणता?

(1) शाळा (2) घराला भाडे नसणे

(3) तुरुंग (4) मंदिर

29. डावीकडे दिलेल्या शब्दाचा विरुद्धलिंगी शब्द कोणता?

***राजा***—

(1) प्रजा (2) रंक

(3) राणी (4) राणा

30. खाली दिलेल्या शब्दसमूहाबद्दल एक शब्द ओळखून त्याचा क्रमांक लिहा.

***आकाशात वावरणारे प्राणी*** .........

(1) भूचर (2) खेचर

(3) जलचर (4) उभयचर

31. खालीलपैकी प्रयोजक क्रियापद असणारे वाक्य कोणते?

(1) आई मुलाला चालवते.

(2) छोट्या दिनूला एक मैल चालवते.

(3) आजारानंतर आता मला चालवते.

(4) ताईला आता सायकल चालवते.

32. खालील वाक्यातील काळ ओळखा.

— मुले शाळेत गेली आहेत.

(1) पूर्ण वर्तमानकाळ

(2) पूर्ण भूतकाळ

(3) अपूर्ण वर्तमानकाळ

(4) पूर्ण भविष्यकाळ

**33.** 'बसमध्ये संजयला मळमळते' या वाक्यातील प्रयोग ओळखा.

(1) कर्तरी प्रयोग (2) कर्मणी प्रयोग

(3) भावे प्रयोग (4) अकर्मक कर्तरी

**34.** 'तो प्रसंग अत्यंत हृदयद्रावक होता' या वाक्यातील प्रयोग ओळखा.

(1) सकर्मक कर्तरी प्रयोग (2) कर्मणी प्रयोग

(3) भावे प्रयोग (4) अकर्मक कर्तरी प्रयोग

**35.** ***'वाक्पति'*** या शब्दाचा संधीविग्रह खालीलपैकी कोणता?

(1) वाक् + पति

(2) वाग् + पति

(3) वाक् + पती

(4) वाक्य + पती

**36.** *'गरजेनुसार'* या शब्दाचा संधीविग्रह खालीलपैकी कोणता?

(1) गरज + नुसार

(2) गरजनु + सार

(3) गरज + अनुसार

(4) गरजे + नुसार

**37.** खालीलपैकी कोणत्या विभक्तीचे प्रत्यय सारखेच आहेत?

(1) द्वितीया व तृतीया

(2) चतुर्थी व षष्ठी

(3) पंचमी व सप्तमी

(4) द्वितीया व चतुर्थी

**38.** खालीलपैकी कोणते अनुनासिक नाही?

(1) न (2) ण

(3) ङ् (4) ज्ञ

**39.** पुढीलपैकी अशुद्ध शब्द ओळखा.

(1) जीवनसत्त्व (2) मन:चक्षू

(3) विसकळित (4) रुक्मिणी

**40.** खाली दिलेल्या वाक्यातील अधोरेखित शब्दाचा कारकार्थ ओळखा व योग्य पर्यायक्रमांक लिहा.

मनाली अमरावतीहून कालच आली.

(1) अधिकरण (2) अपादान

(3) संबोधन (4) कारक

**41.** खालील रिकाम्या चौकोनात पर्यायातील कोणत्या गटाची अक्षरे वापरल्यास दिलेले शब्द अर्थपूर्ण होतील?

☐ रस ☐ रस ☐ रस

(1) वा चौ कौ (2) चौ का वा

(3) औ चौ गौ (4) वा औ चौ

**42.** चुकीची जोडी ओळखा.

(1) श्रीमान योगी — रणजित देसाई

(2) तराळ अंतराळ — शंकरराव खरात

(3) काळे पाणी — वि.दा. सावरकर

(4) छावा — बाबासाहेब पुरंदरे